## ।।ॐ श्री साईराम।।

प्रशांती संदेशच्या ७६ व्या भागात तुमचे स्वागत असो. आजचा विषय आहे करुणा. आपण सर्वतोपरीने स्वामींची कृपा प्राप्त केली पाहिजे. आपल्या येथे अनेक धर्म आहेत. अनेक पद्धती आहेत ज्यांचे आपण अनुसरण करतो व जीवनामध्ये त्यांचा अंगिकार करतो. अमरत्व प्राप्त करण्यासाठी वा परमेश्वराची करुणा प्राप्त करण्यासाठी अनेक संतमहात्मे, द्रष्टे, साधक यांनी विविध मार्ग सांगितले आहेत.

ह्या सर्व सुचवलेल्या पद्धती आहे. पद्धत कोणतीही असो, एक गोष्ट निश्चितपणे सांगता येऊ शकेल की तपस, पठण, विद्वत्ता, उच्चपद वा शरीरावर धारण केली जाणारी गोंदवलेली चिन्हे किंवा अधिकाराची चिन्हे, कठोर तप ह्याच्यामुळे अमरत्व प्राप्त होईल अशी खात्री नाही. अशक्य! जर आपल्याला ते प्राप्त करायचे असेल, जर आपल्याला परमेश्वराची अनुभूती घ्यायची असेल तर त्याची कृपा, दया, करुणा प्राप्त करण्यासाठी, प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, संघर्ष करणे हा एकमेव मार्ग आहे. एकदा का परमेश्वराची कृपा, दया, करुणा संपादन झाली की अन्य सर्व गोष्टींची परिपूर्ती होईल. बाकी सगळं आपोआप होईल. ह्याविषयी नि:शंक राहा.

ह्या जगामध्ये भगवानांची दया, करुणा ह्याहून अधिक महत्त्वाचे दुसरे काही नाही. तो कोणताही धर्ममार्ग असो, कोणताही धर्मग्रंथ, अध्यात्मिक व अन्य काही ग्रंथ असो. केवळ भगवानांची कृपा, दया याहून सर्वश्रेष्ठ आहे जी आपल्या जीवनाचे सार्थक करते, अमरत्व प्रदान करते. अद्वैतावस्थेची अनुभूती देते.

परमेश्वराची कृपा कशी प्राप्त करायची? त्याची दया कशी प्राप्त करायची? त्याचं उत्तर आहे, प्रेम. भगवानांनी स्वत: म्हटले आहे. ''सर्वांवर प्रेम करा, सर्वांची सेवा करा.'' परमेश्वराप्रत जाण्याचा हाच मार्ग आहे, असे त्यांनी सांगितले. प्रेमाकारे. प्रेमाच्या अनुसरणाने व सर्वांची प्रेमाने सेवा केल्याने, आपल्याला निश्चितपणे त्याच्या कृपेची प्राप्ती होऊ शकते. त्याच्या करूणेची, दयेची प्राप्ती होऊ शकते जिच्या सहाय्याने आपण सहजतेने ह्या जगाचा सामना करू शकतो. एकदा त्यांनी असेही सांगितले, ''दिवसाची सुरुवात प्रेमाने करा. संपूर्ण दिवस प्रेमामध्ये व्यतीत करा, संपूर्ण दिवस प्रेमाने व्यापून टाका आणि दिवसाची अखेर प्रेमाने करा.'' हा परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग आहे. आणि म्हणून त्याची असीम कृपा आणि दया प्राप्त करण्यासाठी प्रेम हा केवळ एकच योग्य मार्ग अत्यंत आवश्यक आहे. तो एकमेव मार्ग, केवळ एकमेव गोष्ट आहे. मला त्यांची करुणा प्राप्त होवो. हे प्रिय प्रभु! माझ्यावर दया कर, दयावंत हो, कृपावंत हो. अशी आपली प्रार्थना असायला हवी. आपली सर्व साधना केवळ ह्या मार्गाकडे वळवायला हवी.

पुढे ते म्हणाले, ''प्रेम हाच परमेश्वर आणि परमेश्वर म्हणजेच प्रेम, प्रेमामध्ये जीवन जगा.'' ह्याहून अधिक आपल्याला काय हवे? जर आपण संदर्भासाठी इतिहासाची पानं चाळली तर आपल्याला असं निदर्शनास येईल की आपल्या भगवान श्री सत्यसाई बाबांनी परमेश्वराची कृपा आणि दया प्राप्त करण्यासाठी जो सहज सुलभ मार्ग सांगितला आहे तसा आजतागायत कोणीही सांगितलेला नाही.

शक्य तेवढ्या सोप्या मार्गांनी त्यांनी त्यांचा संदेश सांगितला. ह्या संदर्भात भगवतांनी जे म्हटले आहे ते मी सांगतो व त्याचे भाषांतरही करून सांगतो.

केवळ त्यांच्या कृपेनेच, तुम्ही तुमच्या जीवनाचे उद्धरण करू शकता, अमरत्व प्राप्त करू शकता वा अद्वैतावस्था प्राप्त करू शकता. अन्य कोणत्याही गोष्टीने नाही.

तुम्ही कदाचित एक असूर असाल, राजा असाल वा सम्राट असाल किंवा कदाचित विद्वान पंडित असाल परंतु केवळ परमेश्वराची करुणा, दया प्राप्त करणे आवश्यक आहे. का? कारण ह्या जीवनामध्ये केवळ तीच अत्यावश्यक आहे.

तुम्ही महाज्ञानी असाल, विद्वान पंडित असाल आणि अनेक वादविवादांमध्ये सहभागी होऊन तुमची विद्वत्ता सिद्धही केली असेल वा तुम्ही पद्यरचना करून त्याचे उच्चारण करणारे महाकवी असाल किंवा एखाद्या

गुहेमध्ये बसून कठोर तप करण्याचा दृढ संकल्प करत असाल वा यांत्रिकपणे देवाचे नाम घेण्यावर तुमचा विश्वास असेल तर हे काहीही तुम्हाला सहाय्यकारी होणार नाही. भगवान असं म्हणतात की केवळ स्वामींची कृपा वा त्यांची करुणा तुमच्या सुटकेसाठी येईल.

त्यांनी किती स्पष्टपणे हे सांगितले आहे ते पाहा.

काही लोकांना लांब दाढीबिढी वाढवून असं वाटतं की ते खरोखर आध्यात्मिक आहेत, तसेच काही कुंकवाचा मळवट वा कपाळावर विभूती ह्यासारख्या बाह्य लक्षणांना धारण करतात. परंतु हे लक्षात ठेवा की भगवानांची दया आणि कृपा जी सर्वांत आवश्यक आहे. हा दिखावा वा प्रदर्शन काहीही कामाचे नाही. भगवानांनी सांगितल्यानुसार, आपल्या मनामध्ये ही संकल्पना स्पष्ट झाली पाहिजे.

पुढे ते म्हणतात,

प्राणायाम करताना मी माझा श्वास रोखून धरत असेन. मी परमेश्वराचे नामस्मरण करत असेन, जप करत असेन किंवा शरीराच्या विविध पवित्र्यामध्ये, विविध पद्धतीने प्रार्थना करण्याचा प्रयत्न करत असेन. मी हुंदके देऊन देऊन रडलो वा आक्रोश केला तरी जीवनाचे उद्धरण अशक्य आहे. परमेश्वराच्या हृदयाला पाझर फुटेपर्यंत आपण अत्यंत कळकळीने प्रार्थना केली पाहिजे. परमेश्वराची भेट, त्याच्या हृदयाला पाझर फोडणे व त्याच्याशी एकत्व अशी आपली साधना असायला हवी हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि मनामध्ये ह्याची नित्य जाणीव ठेवली पाहिजे.

मी अध्यात्मिक बनण्याचा प्रयत्न करीत असेन किंवा भगवी वस्त्रे परिधान करून इतरांना मी अध्यात्मिक असल्याचे भासवत असेन वा तुम्ही गळ्यामध्ये जपमाळ घातली असेल. आजकाल आपण गळ्यामध्ये जपमाळ घातलेले अनेक लोक पाहतो. काहीजण मनगटाभोवतीही माळा  घालतात. मी मोजणी करत मणी ओढत असेन व असा विचार करत असेन की मी परमेश्वराचे नामस्मरण करतो आहे; मी अत्यंत गहन तप वा जप करत आहे परंतु त्यांची करुणा अत्यंत महत्त्वाची आहे. मी बाबांनी माझ्याजवळ येण्यासाठी प्रार्थना करत असेन. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा ते आपल्यावर दयेचा वर्षाव करतील.

मी स्तुतीगान करत असेन. स्वामी, मी तुमचे भक्तिभावाने स्तवन करत असेन. तुम्हाला वंदन करण्यासाठी, तुम्हाला लोटांगण घालण्यासाठी मी नियमितपणे पुट्टपर्तीला येण्याचा निश्चय केला असेन, काही विधीवत पद्धतीने धार्मिक व्रत, साधना, भक्ती करत असेन. अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी देत असेन तथापि केवळ करूणेमुळेच मनुष्याला तेज प्राप्त होते.

केवळ करूणेमुळेच तुम्ही तेजोमय बनता असे स्वामींनी स्वत: रचलेल्या ह्या सुंदर पद्धरचनेमध्ये म्हटले आहे. जर मी हे पुन्हा म्हटले तर ते तुम्हाला आनंद देईल. का? मला माहीत आहे.

हे पुन्हा म्हणून मी तुमचा वेळ घेतला असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. केवळ तुम्हाला स्वामींच्या भाषेचा स्वाद देण्यासाठी व मूळ रचनेचा रसास्वाद घेण्यासाठी मी हे पुन्हा म्हटले. गैरसमज नसावा. तुमच्या हितासाठी ह्याचे मी इंग्रजी भाषांतरही देतोय. आता तुम्हाला ते काय आहे ते समजेल आणि त्यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी प्रेमाचा एकमात्र मार्ग आहे असे त्यांनी म्हटले आहे ते ही समजेल आणि तुम्ही त्याचा आनंद लुटाल. त्यांची कृपा प्राप्त करण्यासाठी, त्यांचा आनंद लुटण्यासाठी आणि त्यांची अनुभूती घेण्यासाठी, ते येथे काय म्हणतात–

प्रेमाचे रूप धारण करून ते आले. स्वामींनी अनेक वेळा, ‘प्रेम माझे रूप आहे’ असे म्हटले आहे. स्वामींनी रचलेले आणि प्रस्तुत केलेले  ‘लव्ह इज माय फॉर्म, ट्रुथ इज माय ब्रेथ, ब्लिस इज माय फूड’ हे गीत आठवा.

म्हणून प्रेम त्यांचे रूप आहे.

ते सर्वांवर प्रेमाचा वर्षाव करतात. आपल्या जीवनामध्ये प्रेम मिसळतात. ते प्रेमाचा प्रसार करतात आणि ते प्रेम आहेत आणि ते तुम्हाला प्रेमाने व्यापून टाकतात.

कृष्णाचे रूप म्हणजे साक्षात प्रेम. कृष्णावतार म्हणजे मूर्तिमंत प्रेम! आपण त्या प्रेमासाठी व्याकूळ व्हायला हवं. त्याचा ध्यास घ्यायला हवा. ते भगवान कृष्ण आज साई कृष्ण बनून आपल्यामध्ये वावरताहेत.

प्रेम हे परमेश्वराचे खरे स्वरूप आहे. परमेश्वर प्रेमाने व्यापलेला आहे. म्हणून भगवान बाबा म्हणतात, प्रेम हाच परमेश्वर, परमेश्वर म्हणजेच प्रेम, प्रेमामध्ये जीवन जगा.''

प्रेम प्रेमाशी जोडले जाते आणि ताळमेळ बनतो. ते असं म्हणतात, तुमच्या आणि परमेश्वरातील संपर्क आणि अनुसंधान म्हणजे प्रेमाचा प्रेमाशी व हृदयाचा हृदयाशी संपर्क व अनुसंधान. असे असेल तरच द्रवित होऊन त्यांच्याशी एकत्व पावणे शक्य आहे. ते एकमात्र अनुसंधान आहे जे आपण समजून घ्यायला हवं.

म्हणून जर आपल्याकडे ते समग्र, संपूर्ण प्रेम असेल तर काय होते? त्या प्रेमस्वरूपाची भक्ती करणे, ते प्रेम आहे ह्याचा बोध होणं प्रेमासहित अनुसंधान प्रस्थापित करणे, आणि जर तुम्ही प्रेमाने व्याप्त असाल तर तुम्ही अद्वैत अवस्था, अद्वैत आनंद, अद्वितीय आनंद, नव्यानंद, चिदानंद, दिव्यानंद, अद्वैत आनंद, सदानंद लुटू शकता. हे सर्व केवळ प्रेमाद्वारेच शक्य आहे. प्रेम हाच परमेश्वर असं ते म्हणतात.

दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले–

परमेश्वर प्रेमस्वरूप आहे. प्रेम हे त्याचे दिव्य रूप आहे.

त्यानंतर ते म्हणतात,

वा! वा! त्यांनी किती सुंदर सांगितलं आहे ते! प्रेम हा समस्त प्राणिमात्रांसाठी प्रिय मंत्र आहे आणि आपल्या जीवनाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे.

पाहा, त्यांनी किती सुंदर रचना केली आहे! जर तुम्ही ह्या जगामध्ये तसूभरही प्रेम व्यक्त करू शकला नाहीत, जर तुमच्याकडे कणभरही प्रेम नसेल तर तुमच्या मनोकामनांची पूर्ती कशी होणार? तुम्हाला तुमचे इच्छित सुपरिणाम कसे प्राप्त होणार? तुम्हाला तुमच्या ध्येयाची प्राप्ती कशी होणार? जीवनामध्ये यश संपादन कसे करणार? हे मानवा, तू त्यांचा जिथे कुठे शोध घेशील, तू कोठेही शोध घेतलास तरी परमेश्वर हा एकमेव मार्ग आहे. आपण त्या दिव्यत्वाने आपले जीवन संपृक्त केले पाहिजे आणि समाजातील प्रत्येकाला त्या प्रेमात सहभागी करून घेतले पाहिजे एवढेच! म्हणून आजचा विषय आहे– एकमेव मार्ग वा तुम्ही प्रेम हा एकमात्र मार्ग असेही म्हणू शकता.

साईराम!

पुन्हा भेटू या.

***